**प्रकरण क्र. ६४**

मा.सभागृहाचे पूर्व परवानगीने आयत्यावेळी घेण्यात आलेले प्रकरण.

विषय :- महिला व बालकल्याण योजना सन २००९-२०१० या आर्थिक वर्षामध्ये
विविध योजनांची अंमलबजावणी करणेस मंजूरी मिळणेबाबत.

**ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक ६५ दिनांक १८/०७/२००९**

**ठराव :-**

प्रकरणी कार्यालयीन अहचवाल पाहता, राज्य शासनाच्या निर्देशानुसार, महिला व बालकल्याण योजना सन २००९-२०१० या आर्थिक वर्षामध्ये विविध योजनाची अमंलबजावणी करण्याची आहे . त्यानुसार खालील प्रमाणे योजना प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ. क्र . | योजनेचे नांव | प्रत्येकी अनुदान | भौतिक लक्ष | आर्थिक लक्ष (रुपये) | अंमलबजावणी करणार विभाग |
|---|---|---|---|---|---|
| १ | दुर्बल घटकातील मुलींच्या/मुलांच्या पालकांना उपस्थिती भत्ता<br>इयत्ता १ ली ते ७वी<br>इयत्ता ८वी ते १०वी | रु.१५००/-<br>रु.१५००/- | १४००<br>६०० | रु.२१,००,०००/-<br>रु.९,००,०००/- | शिक्षणाधिकारी ठा.म.पा.<br>सहाय्यक आयुक्त |
| २ | ठा.म.पा. शाळेतील मागासवर्गीय मुलींना/मुलांना शिष्यवत्ती देणे.<br>इयत्ता ५ वी ते ७ वी<br>इयत्ता ८ वी ते १० वी | रु.१०००/-<br>रु.१०००/- | १०००<br>१००० | रु.१०,००,०००/-<br>रु.१०,००,०००/- | शिक्षणाधिकारी ठा.म.पा.<br>सहाय्यक आयुक्त |
| ३ | स्वयंरोजगार योजनेखाली आर्थिकदष्टया दुर्बल घटकांतील महिलांना व्यक्तीगत अर्थ सहाय्य देणे | रु.५,०००/ | १००० | रु.५०,००,०००/- | समाज विकास विभाग |
| ४ | आर्थिक दृष्टया कमकुवत असलेल्या स्त्रियांना मोफत शिलाई मशिन पुरविणे. | १ मशीन रु.४०००/- | १००० | रु.४०,००,०००/- | समाज विकास विभाग |
| ५ | ठा.म.पा. शाळेतील इयत्ता ८वी ते १०वी मधील मुलींना/मुलांना मोफत सायकल पुरविणे. | रु.३,५००/ | २००० | रु.७०,००,०००/- | समाज विकास विभाग. सहा.आयुक्त, शिक्षण मंडळ |
| ६ | निराधार, निराधीत, विधवा महिलांच्या मुलींच्या विविहा करीता अनुदान. | रु.१०,०००/- | ३०० | रु.३०,००,०००/- | समाज विकास विभाग |
| ७ | महापालिका परिक्षेत्रातील महिला व बाल विकास क्षेत्रात उत्कष्ट कार्य करीत असलेल्या समाज सेविकांना पुरस्कार | रु.५,०००/- | ४५ | रु.२,२५,०००/- | माहिती व जनसंपर्क विभाग |
| ८ | आदर्श स्त्री शिक्षिका पुरस्कार<br>प्राथमिक शाळा -३५<br>माध्यमिक शाळा -१० | रु.५०००/- सन्मानपत्र शाल, साडी आणि श्रीफळ | ४५ | रु.२,२५,०००/- | माहिती व जनसंपर्क विभाग |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | आदर्श आंगणवाडी/बालवाडी सेविकांना पुरस्कार आंगणवाडी सेविका-२५<br>बालवाडी सेविका -१५ | रु.५,०००/- | ४० | रु.२,००,०००/- | सहाय्यक आयुक्त सर्व प्रभाग समिती.समाजविकास विभाग |
| १० | आर्थिकदृष्टया गरीब महिलांना साडया पुरविणे.<br>(BPL लाभार्थींना प्राधान्य) | रु.५००/-<br>(साडी ब्लाऊज पिससह) | २००० | रु.१०,००,०००/- | सहाय्यक आयुक्त सर्व प्रभाग समिती.समाजविकास विभाग |
| ११ | आर्थिक दष्टया गरिबी स्त्रियांना संसार उपयोगी साहित्य पुरविणे<br>(BPL लाभार्थीना प्राधान्य) | रु.१,५००/- | २३३३ | रु.२२,५०,०००/- | सहाय्यक आयुक्त सर्व प्रभाग समिती.<br>समाजविकास विभाग. |
| १२ | गरीब मुलींच्यासाठी अर्थसहाय्य<br>( BPL लाभार्थीना प्र्धान्य) | रु.५०००/- | १०० | रु.५,००,०००/- | सहाय्यक आयुक्त सर्व प्रभाग समिती समाजविकास विभाग |
| १३ | आर्थिक दष्टया गरीब मुलींना तांत्रिक व व्यवसायीक प्रशिक्षणासाठी आर्थिक मदत. | रु.५,०००/- | १०० | रु.५,००,०००/- | समाज विकास विभाग |
| १४ | उच्च शिक्षण घेणा-या होतकरु मुलींसाठी एक रक्कमी अर्थसहाय्य<br>(BPL लाभार्थीना प्रधान्य) | रु.१०,०००/- | २५० | रु.२५,००,०००/- | माहिती व जनसंपर्क विभाग<br>समाजविकास विभाग |
| १५ | महिला व बालकल्याण रोग निदान शिबीराचे आयोजन प्रति प्रभाग समिती निहाय आयोजन करणे | रु.५५,०००/-<br>प्रति प्रभाग समिती | ९ | रु.५,००,०००/- | आरोग्य विभाग मार्फत सहाय्यक आयुक्त प्रभाग समिती |
| १६ | **महिला मंडळातर्फे वाचनालय व प्रौढ शिक्षण:-**<br>नोंदणीकत महिला मंडळामार्फत झोपडपटटी भागातील महिलांसाठी विविध कार्यक्रम आयोजित करुन जनजागृतीचे काम करणे गावामध्ये वाचनालय,प्रौढ शिक्षण वर्ग शिबीर व मेळावे घेणे, व आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील लाभार्थी महिलांचा अभ्यास पाहाणी दौरा आयोजित करणे | रु.११,०००/-<br>प्रती प्रभाग समिती | ९ | रु.१,००,०००/- | माहिती व जनसंपर्क विभाग<br>समाजविकास विभाग |
| १७ | ठामपा क्षेत्रातील आंगणवाडया /बालवाडयांना साहित्य पुरविणे | रु.२,८०,०००/-<br>प्रती प्रभाग समिती | ९ | रु.२५,००,०००/- | समाजविकास विभाग<br>सहा.आयुक्त शिक्षण विभाग |
| १८ | बालकांच्या/महिलांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळणेसाठी स्पर्धा आयोजित करणे | रु.५५,०००/-<br>प्रती प्रभाग समिती | ९ | रु.५,००,०००/- | माहिती व जनसंपर्कविभाग व<br>समाजविकास विभाग |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १९ | महिला मंडळ/स्वयंसेवी संस्थंना उघोग धंदयातील प्रशिक्षणासाठी अनुदान (ठामपा क्षेत्रातील अस्तिवात असलेले महिला मंडळ व स्वंयसेवी नोंदणीकत संस्थाना शहरी उद्योगातील प्रशिक्षणासाठी अनुदान या योजानेखाली देण्यात येते) | रु.१०,०००/- | ५० | रु.५,००,०००/- | समाज विकास विभाग |
| २० | गलिच्छ वस्ती व झोपडपटटीतील मुलांसाठी चालविण्यात येणा-या बाल मार्गदर्शन केंद्र व बाल चिकित्सा केंद्र यांना अनुदान (प्रत्येकी रु.१०,०००/-) | | ५० | रु.५,००,०००/- | आरोग्य विभाग व समाज विकास विभाग व सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती |
| २१ | महिला प्रतिनिधीची अभ्यास सहल. (महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत पदाधिकारी यांचे अधिकार व कर्तव्याबददल विविध शासकीय योजना, कार्यालयीन कामकाज प्रशिक्षणाबाबत अभ्यास सहल आयोजित करणे) | | | रु.५,००,०००/- | समाज विकास विभाग |
| २२ | ज्या भागात बालवाडया/ आंगणवाडया नाहीत त्या ठिकाणी नवीन बालवाडया सुरु करणे / बांधणे / बालवाडया दुरुस्त करणे / रंगरंगोटी करणे. (प्रती प्रभाग समिती निहाय रु.२,४०,०००/- पर्यंत) | | 9 | रु.२५,००,०००/- | समाज विकासविभाग/ सार्वजनिक बांधकाम विभाग |
| २३ | हुंडा पध्दतीचे निर्मुलन व भृणहत्त्या रोखण्यासाठी विविध कार्यक्रम हाती घेणा-या व कार्यक्रमाचे संस्थेमार्फत गडकरी रंगायतन येथे कार्यक्रम आयोजित करणे. (जिल्हयातील हुंडयाच्या प्रचलित असलेल्या अनिष्ट रुढीचे कायमचे उच्चाटन करण्यासाठी या कार्यक्रमाअंतर्गत हुंडा पध्दीतीच्या दुष्परिणामाबाबत जनजागरण, प्रचार व प्रसिध्दी देणे, हुंडा विरोधी दश्यांचा अंतर्भाव असलेली कला पथके,पथनाटय प्रदर्शन याचबरोबर महिलांना विनामुल्य कायदेशीर सहाय्याबाबत माहिती देणा-या संस्थाना अनुदान) | | | रु.५,००,०००/- | माहिती व जनसंपर्क विभाग व समाज विकास विभाग |
| २४ | सावित्रीबाई फुले बहुउदेशिय महिला केंद्र बांधणे/पाळणाघर मनपा कडून बांधून अनुभवी स्वंयसेवी संस्थेमार्फत व्यवस्थापन व संचालन करीता आधार केंद्राच्या धर्तीवर एक ''बहुउदेशिय महिला केंद्र'' स्थापन करण्यात यावे.<br>१) महिलांना कायदेविषयक सल्ला उपलब्ध करुन देणे<br>२) व्यवसाय किंवा नोकरी निवडीबाबत सल्ला.<br>३) अनदग्रस्त महिलांना तात्पुरता आश्रय देणे.<br>४) व्यवसायिक प्रशिक्षणासाठी सल्ला देणे<br>५) महिलांना वाचनालय सुविधा उपलब्ध करुन देणे.<br>६) व्यवसाय प्रशिक्षण केंद्र चालविणे.<br>७) पाळणाघर चालविणे.<br>८) पौढ साक्षरता वर्ग चालविणे.<br>९) शासनाच्या विविध विभागाच्या अधिका-यांनी त्यांच्या योजनांबाबत मार्गदर्शन उपलब्ध करुन देणे. महिलांना प्रशिक्षण देणे / सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन करणे. | | | रु.२५,००,०००/- | सार्व.बांध.खाते /शहर विकास विभाग व समाज विकास विभाग |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५ | जिजामाता महिला आधार योजनेस आर्थिक अनुदान :- महानगरपालिका क्षेत्रातील व आर्थिक दष्टया दुर्बल घटकांतील कुटुंब प्रमुख (कुटुंबातील पुरुष /स्त्री कर्त्या व्यक्तीचे वय २१ ते ७० वर्ष ) अपघाती निधन झाल्यास त्याच्या विधवा पत्नीस अथवा मुली/मुलास रु.२५०००/- एक रक्क्म अर्थ सहाय्य ठाणे महानगरपालिकेकडून देण्यात येते.तसेच अपघाती निधना व्यतिरिक्त सदर व्यक्तीस कायमस्वरुपी अपंगत्व आले असेल तरीही रु.२५०००/- एक रक्कम अर्थसहाय्य ठाणे महानगरपालिकेकडून देण्यात येते. या योजनेचा लाभ फक्त केशरी पिवळया रंगाच्या सर्व शिक्षापत्रिका धारक कुटुंबास अनुदान आहे. तसेच कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.४०,०००/- चे आत असल्याचा तहसिलदार/विशेष कार्य अधिकारी ठाणे यांचेकडील उत्पन्नाचा दाखला. | ८० लाभार्थी | रु.२०,००,०००/- | आरोग्य विभाग व समाज विकास विभाग |
| २६ | सावित्रीबाई फुले कल्याण योजना/गरजु महिला/ मुलींकरीता वसतीगह बांधणे व चालवणे :- मुंबईच्या धर्तीवर उच्च शिक्षणासाठी देशाच्या निरनिराळया भागातून मोठया संख्येने विघार्थिनी (महिला/मुली) मुंबई व ठाण्यात येतात त्यांच्या रहाण्याची उत्तम सोय होण्याचे दष्टीने ठाणे महानगरपालिकेच्या हददीत ही वसतीगह बांधणे व चालवणे (शासनाने सावित्रेदेवी फुले महिला छात्रालय,मुंबई हे केवळ मुलींसाठी असलेले वसतिगह सुरु केलेले आहे त्याच धर्तीवर ठाण्यामध्ये मुलींकरिता वसतिगह सुरु करणे आवश्यक आहे.तसेच गरजु महिलासांठी ज्या महिलाना घरगुती अडचणीमुळे तातडीने तात्पुरत्या स्वरुपात किंवा काही कालावधीसाठी आश्रयाची गरज आहे, अशा महिलांची तातडीची गरज पूर्ण करण्यासाठी सदर योजना राबविण्यात येत आहे. स्वयंसेवी संस्थेमार्फत वसतीगह चालविण्यात यावे गरजु महिलांना वसतीगहात दोन वर्षापर्यत मोफत रहाण्याची सुविधा व मोफत जेवण देण्यात यावे. | | रु.२०,००,०००/- | सर्व.बांध. विभाग श.वि.वि. व समाज विकास विभाग |
| २७ | ठा.म.पा. शाळेतील प्राथमिक व माध्यमिक सर्व विद्यार्थ्यांना मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारीरीक व मानसिक विकासासाठी प्रशिक्षण योजना :- या योजनेतून मुलींना कुंफु, कराटे, योगाचे प्रशिक्षण देण्यात यावे कोणत्याही व वयोगटातील परंतु आर्थिक दष्टया मागासलेल्या कुटुंबातील मुलींना सदर प्रशिक्षण मोफत देण्यात यावे. योजनेतून प्रशिक्षकाचे मानधनावर साधारणपणे प्रति लाभार्थी दरमहा रु. १००/- पर्यंत खर्च करण्यात यावा व सदर प्रशिक्षण तज्ञांकडून देण्यात यावे. प्रशिक्षण सत्रः-सहा महिन्याचे असेल १०० X ६ = ६०० प्रतीलाभार्थी प्रशिक्षण शुल्क प्रशिक्षकाचे मानधन प्रशिक्षण देणा-या संस्थेस अदा करण्यात येतील. संबंधित संस्थेकडून लाभार्थींना प्रशिक्षण पूर्ण केल्याबाबत सर्टीफिकेट देणे बंधनकारक राहील. त्याचा खर्च दिला जाणार नाही. एकूण लाभार्थी संख्या - मागणीनुसार प्रशिक्षणार्थीस प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्र देण्यात यावे व प्रमाणपत्राचा खर्च देण्यात आलेल्या मानधनातून करण्यात यावा.<br>५ वी ते ७वी - ६०० लाभार्थी एकूण रु.३,६०,०००/-<br>८वी ते १०वी - ६०० लाभार्थी एकूण रु.३,६०,०००/- | | रु.२०,००,०००/- | सहाय्यक आयुक्त पुर्व प्राथमिक/ प्राथमिक विभाग व माध्श्मिक विभाग<br><br>शिक्षणाधिकारी, ठा.म.पा.व समाज विकास विभाग |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २८ | महिलांसांठी सांस्कतिक सभागह बांधणे. | १ | रु.४०,००,०००/- | सर्व.बांध विभाग, समाज विकास विभाग व शहर विकास विभाग |
| २९ | महिलांना स्वंयरोजगार सुरु करण्याकरिता विविधं व्यवसायाचे प्रशिक्षण देणे.:-उदा. व्यवसायिक व घरगुती सर्व विघुत उपकरणे (संगणक, इस्त्री,फ्रिज, वॉशिंग मशीन, टिव्ही,मोबाईल, दुरुस्ती करणे) टेलरींग कोर्स, फॅशन डिझायनिंग,इंगिलश स्पिकिंग ब्युटी पार्लर कोर्स,MSCIT, प्रशिक्षण देणे. प्रति लाभार्थी रु.३५००/- प्रमाणे ३०० लाभार्थ्यांयाठी | | रु.१०,५०,०००/- | समाज विकास विभाग |
| ३० | महिला बचत गटास अनुदान देणे रु १०,०००/- प्रत्येक गटांस प्रमाणे एकूण ३०० गटांना अनूदान देणे. | ३०० | रु.३०,००,०००/- | समाज विकास विभाग |
| ३१ | योजना प्रसिध्दी पुस्तिका/जहिरात आाकस्त्मित व किरकोळ खर्च, व इतर नियोजित योजना. | प्रस्तावित | रु.११,३०,०००/- | समाज विकास विभाग |
| ३२ | विधवा घटस्फोटीत व परितक्त्य महिलांना व्यवसायासाठी अर्थसहाय्य देणें रु.५०००/- प्रति महिला (स्थानिक नगरसेवकांचे शिफारसपत्र आवश्यक) | १००० | रु.५०,००,०००/- | समाज विकास विभाग |
| ३३ | अंध व अस्थिव्यंग व कर्णबधिर मुले व मुली यांना शारिरिक व मानसिक उपचारासार्ठी अर्थिक मदत करणे प्रति रु.६०००/- प्रमाणे | २५० | रु.१५,००,०००/- | समाज विकास विभाग |
| ३४ | आर्थिक दष्टया दुर्बल घटकातील महिलांना मोफत घरघटी पुरविणे.रु.१२०००/-प्रमाणे | १०५० | रु.१,२६,००,०००/- | समाज विकास विभाग |

सन २००९-२०१० चे अर्थसंकल्पात महिला व बालकल्याण कार्यक्रमांतर्गत विभाग क्र .३३०० फंकशन कोड ७२० संकेतांक २५७६०२ मध्ये रक्कम रु ७,५०,००,०००/- (अक्षरी रुपये सात कोटी पन्नास लक्ष मात्र) आर्थिक तरतूद आहे. सदर तरतुदीमधून प्रस्तावित योजनेसाठी रक्कम खर्च करण्याची आहे. तसेच सन २००८-०९ या आथिक वर्षात प्रस्तावित केलेल्या परंतू लाभ न दिलेल्या पात्रता निश्चित केलेल्या लाभार्थीना या आर्थिक वर्षातील तरतूद रक्कमेमधून खर्च करणेस मंजूरी देणेत येत आहे. त्यानुसार वरील प्रस्तावित योजनेकरिता लाभार्थी पात्रता निश्चितीकरीता योजनेची जाहिरात प्रसिध्द करणे, वस्तू खरेदी करणे, तसेच दैनिक राज्यस्तरीय व स्थानिक वत्तपत्रात निविदा मागविणेची जाहिरात देणें, निविदा मागवून लाभार्थांना लाभ देणे. एखादया घटक योजनेतील काही अडचणींमुळे रक्कम खर्च न झाल्यास सदर निधी इतर घटक योजनेमध्ये वर्ग करणे, भौतिक लक्ष कमी-जास्त करणे अकस्मित व नियोजित योजनांबाबत प्रस्ताव बनवून कार्यवाही करणेबाबत मा.आयुक्त सो. यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहे. याकरीता ही सर्वसाधारण सभा मा.आयुक्त

यांना प्राधिकृत करीत आहे. तसेच वरील योजनांची अंमलबजावणी करण्यास व येणा-या रक्कम रु.७,५०,००,०००/- (अक्षरी रुपये सात कोटी पन्नास लक्ष मात्र) च्या खर्चास व सदर खर्च सन २००९-२०१० चे महिला व बालकल्याण लेखाशिर्षकामधून करण्यास ही सर्वसाधारण सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

प्रशासनाने सदर प्रस्तावातील तांत्रिक व कायदेशीर बाबी तपासल्या असून, त्या योग्य व कायदेशीर आहेत असे गृहीत धरुन ही सर्व साधारण सभा हया प्रस्तावास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.

प्रकरण प्रशासनाने इतिवृत्त मंजूरीची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी असे ही सर्वसाधारण सभा ठरवित आहे.

सुचक :- श्री.पांडूरंग पाटील

अनुमोदक :- श्री.हणमंत जगदाळे

सर्वानुमते मंजूर ...

sd /-

महापौर

ठाणे महानगरपालिका, ठाणे.

प्रत : मा.आयुक्त सो. यांचे माहितीसाठी सविनय सादर.